**महत्त्वाचे**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८, लेखा विभाग,
क्र.लेखा /५/आयकर /११४६/२०१५
दिनांक :- ११/ ०९/२०१५

**विषय :- आयकराबाबत...........**
**आर्थिक वर्ष २०१५-१६**
**आकारणी वर्ष २०१६-१७**

**परिपत्रक,**

कलम २/- फायनान्स ऍक्ट २०१५ मध्ये नमूद केलेनुसार आयकर कायदा १९६१ चे कलम १९२ अन्वये पगारदार करदात्यांच्या पगारातून आयकर वजातीसाठी आर्थिक वर्ष २०१५-१६ म्हणजेच आकारणी वर्ष २०१६-१७ साठीचे आयकर दर खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **उत्पन्न मर्यादा** | **आयकराचा दर** |
|---|---|---|
| १ | पहिले र.रु. २,५०,०००/- पर्यत | पूर्णपणे करमुक्त |
| २ | र.रु. २,५०,००१/- ते ५,००,०००/-पर्यंत | १०**%** |
| ३ | र.रु.५,००,००१/- ते र.रु.१०,००,०००/-पर्यंत | २०**%** |
| ४ | र.रु.१०,००,०००/- चे पुढील उत्पन्नावर | ३०**%** |

जर करपात्र उत्पन्न र.रु. ५ लाख पेक्षा कमी असेल तर वरीलप्रमाणे करमुक्त करीता २,०००/- किंवा येणारा कर यापैंकी कमीत कमी रक्कमेची सुट देण्यात आली आहे.

वरीलप्रमाणे येणा-या देय आयकरावर ३**%** एज्युकेशन सेस (२**%** शिक्षणकर व अधिभार + १**%** उच्च शिक्षणकर ) भरावा लागेल. तसेच जर करपात्र उत्पन्न र.रु. १ कोटी पेक्षा जास्त असेल तर आयकर रक्कमेच्या १२% अधिभार आकारण्यात यावा.

१) **आयकरासाठी विचारात घ्यावयाचे एकूण उत्पन्न :-**

कर्मचा-यांचे / अधिका-यांचे एकूण पगाराचे उत्पन्न विचारात घेताना पगाराबरोबरच त्यांना पुरविलेल्या सुखसोयींची रक्कम कलम १७ (२) आणि नियम ३ नुसार विचारात घ्यावी.उदा. मोफत रहावयास दिलेले घर, घराच्या भाडयात दिलेली सवलत, पुरविलेले वाहन, **धन्वंतरी स्वास्थ योजना** अंतर्गत घेतलेल्या सेवाचे मुल्य इ. सोयी / सवलत कर्मचा-याला /अधिका-याला पुरविल्या असतील तर आणि त्यांचे मुल्य आयकर नियम ३ नुसार कर्मचा-यांचे/अधिका-यांचे पगारात धरले असेल तर ज्या कर्मचा-यांचा / अधिका-यांचा वार्षिक पगार र.रु.२,००,०००/- पेक्षा जास्त आहे. त्यांचे बाबतीत अशा सर्व सोयी / सवलतीची आणि मुल्यांकनाची माहिती देणारा **फॉर्म क्र.१२ बी. ए.** संबंधित कर्मचा-याला/अधिका-याला कार्यालयामार्फत कर कपातीचे प्रमाणपत्रासोबत **(फॉर्म नं.१६)** सोबत देणेत यावा.

२) **आयकर कायदा कलम १० नुसार वजावटीत पात्र असलेले भत्ते :-**

अ) वरील मुद्दा क्र.१ प्रमाणे पगाराचे एकूण उत्पन्न निश्चित केलेनंतर त्यामधून कर्मचा-यांस / अधिका यांस आयकर कायदा **कलम १०** नुसार वजावटीस पात्र असलेल्या भत्याची **उदा. वाहतूक भत्ता** (द.म.र.रु.१,६००/- मर्यादिपर्यत, अपंग असल्यास द.म.र.रु. ३२००/- मर्यादे पर्यंत वजावट करावी. उर्वरीत रक्कम करपात्र धरण्यात यावी). तसेच फिरती भत्ता, धुलाई भत्ता यासारख्या भत्यांची रक्कम कपात (वजा) करण्यात यावी.

ब) वैद्यकिय कार्डमध्ये नमूद असणा-या सदस्यांचे आजारपणावर झालेला र.रु.१५,०००/- पर्यंतचे वैद्यकिय प्रतिपूर्ती.

क) प्रवास भाडे भत्ता प्रत्यक्षात प्रवासासाठी केलेला खर्च किंवा मिळालेले प्रवासभाडे यामध्ये जे कमी असेल ती रक्कम वजावटीसाठी विचारात घ्यावी.

३) **आयकर कायदा कलम १६ नुसार करावयाच्या वजावटी :-**

वरील मुद्दा क्र. १ मध्ये नमूद केलेल्या एकूण उत्पन्नातून मुद्दा क्र. २ मध्ये नमूद केलेले कलम १० नुसार वजावटीस पात्र असलेले भत्ते कपात (वजा) केलेनंतर येणा-या रकमेतून आयकर कायदा कलम १६ नुसार व्यवसाय कर **(Professional Tax)** र.रु.२,५००/- पर्यंत या कराची रक्कम कपात करण्यात यावी.

वरीलप्रमाणे कार्यवाही केल्यानंतर पगारातून मिळणारे उत्पन्न निश्चित होईल.

४) **<u>कर्मचा-यांस / अधिका-यांस अन्य मार्गाने मिळणारे उत्पन्न तसेच घरबांधणी कर्जावरील व्याजाबाबत</u> :-**

एखाद्या कर्मचा-यांला / अधिका-यांला पगाराशिवाय घरभाडे / व्याज यासारख्या अन्य मार्गाने उत्पन्न मिळत असलेस, सदरचे उत्पन्न हे सत्यप्रतिज्ञेवर स्वाक्षरी करुन आयकर साठी उपन्न गृहीत धरणेत यावे, अशा उत्पन्नाची माहिती आयकर फॉर्म नं. १२ बी. ए. भरणेत यावी. जर फॉर्म १२ बी. मध्ये भाडे नमूद केल्यास त्या भाडयामधून संबंधित मिळकतीचा मिळकत कर वजा करावा आणि उर्वरीत उत्पन्नामधून ३०**%** प्रमाणित वजावट **(Standard Deduction)** करावे.

| | | |
|---|---|---|
| **उदा.** | भाडयापासून मिळणारे उत्पन्न र.रु. | १,५०,००० |
| | (-) मिळकत कर (मनपाचे) | १०,००० |
| | | १,४०,००० |
| | (-)३०**%** प्रमाणित वजावट (१,४०,०००) | ४२,००० |
| | (-) व्याज (घरकर्जाचे) | ५०,००० |
| | फॉर्म १२ बी. मध्ये दर्शविणारे उत्पन्न | ४८,००० |

*भाडयाच्या मिळकतवर व्याजाच्या कपातीची मर्यादा नाही.

त्याचप्रमाणे जर कर्मचा-यांचे / अधिका-यांने १ एप्रिल १९९९ नंतर ज्या आर्थिक वर्षात घरबांधणी/ नविन घर विकत घेणे/ घरदुरुस्ती व नुतणीकरणासाठी कर्ज घेतले असेल त्या वर्षापासून पुढील ३ वर्षात वास्तु पूर्ण होवून रहिवास सुरु झाला असेल तर त्याला **घरबांधणी / घर दुरुस्ती कर्जाच्या व्याजात र.रु.२,००,०००/- पर्यंत व दि.०१/०४/१९९९पुर्वीच्या घरबांधणी / घर दुरुस्ती कर्जाच्या व्याजासाठी र.रु.३०,०००/- पर्यंत आयकर कायदा कलम २४ नुसार** मिळणारी वजावट वरील उत्पन्नातून कपात (वजा) दर्शविण्यात यावी.

६) **<u>चॅप्टर VIA नुसार कलम ८० सी,८० सी.सी.सी. व ८० सी.सी.डी. च्या मिळणा-या वजावटी</u> :-**

आयकर कायदा कलम ८० सी नुसार कर्मचा-यांचे / अधिका-यांने केलेल्या खालील गुंतवणूकीवर वजावटी मिळतील.

1) एल. आय.सी. हप्ता **(Premium)** रक्कम (पती /पत्नी/अपत्य/स्वत: )
2) मान्यता प्राप्त प्रा. फंडाची वर्गणी प्रा. फंड कायद्याप्रमाणे
3) प्रा. फंड ऍक्ट १९२५ अन्वये प्रा. फंड वर्गणी रक्कम
4) डिफर्ड ऍन्युईटी स्क्रीम मधील रक्कम
5) पब्लिक प्रा. फंड स्क्रीम १९६८ मध्ये भरलेली वर्गणी
6) मान्यता प्राप्त सुपर ऍन्युएशन फंडाची वर्गणी
7) सी.टी.डी. रुल्स १९५९ नुसार पोस्टाच्या आवर्त ठेव योजनेत १० व १५ वर्षासाठी ठेवलेली रक्कम.
8) एन.एस.एस.रुल्स १९९२ अन्वये एन.एस.सी. मध्ये गुंतविलेली रक्कम व त्यावर दरसाल होणारे व्याज शेवटच्या वर्षाचे व्याज सोडून.
9) किसान विकास पत्र, नॅशनल सेव्हिंग सर्टीफिकेट, पीपीएफ, युनिट लिंक्ड इन्शुरन्स प्लॅन १९७१ अन्वयेची रक्कम
10) आयुविमा महामंडळाच्या म्युच्युअल फंडाच्या युनिट लिंक्ड् इन्शुरन्स प्लॅनसाठी भरलेली वर्गणी.
11) आयुविमा महामंडळाच्या मान्यता प्राप्त ऍन्युईटी प्लॅनमधील रक्कम
12) मान्यताप्राप्त म्युच्युअल फंड किंवा युनिट ट्रस्ट म्युच्युअल फंडामध्ये भरलेली वर्गणी.
13) मान्यता प्राप्त पेन्शन फंडाची वर्गणी (कलम ८० सी.सी.सी. व ८० सी.सी.डी. खालील सोडून)
14) नॅशनल हाऊसिंग बँकेच्या मान्यता प्राप्त डिपॉझिट स्क्रिमसाठी भरलेली वर्गणी.
15) जीवनधारा पॉलीसी, जीवन अक्षय पॉलीसी यांची भरलेली वर्गणी.
16) घरबांधणी कर्जासाठी घेतलेल्या कर्जाच्या मुद्दलाचे हप्ते, रजिस्ट्रेशन फी,स्टॅम्प डयुटी इ.

**17)** एल.आय.सी. ने नव्याने सुरु केलेल्या विमा निवेश पॉलीसीखाली भरलेला एकवट रकमेचा हप्ता.

**18)** कर्मचा-यांने आपल्या मुलांसाठी भरलेली शाळा / कॉलेज अगर विद्यापीठाची टयुशन फी मात्र ही फी जास्तीत जास्त २ मुलांचेसाठी वजावटीसाठी विचारात घ्यावी

**19)** शेडयुल बँकेत ५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त मुदतीसाठी ठेवलेली मुदत ठेंवीची रक्कम वजावटीसाठी विचारात घ्यावी.

**20)** पोस्ट ऑफीस टाईम डिपॉझिट रुल१९८१ नुसार ५ वर्षे कालावधीसाठी ठेवलेली रक्कम.

**21)** जर कर्मचा-याने स्वत:च्या मुलीसाठी सुकन्या समृध्दी अकाउन्ट योजना अंतर्गत ठेव ठेवली असलेस वजावटीसाठी पात्र आहे.

**22)** <u>कलम ८० सी.सी.सी. खालील मान्यता प्राप्त पेन्शन फंडाची वर्गणी :-</u> एल.आय.सी. च्या किंवा अन्य सरकारमान्य खाजगी क्षेत्रातील इन्शुरन्स कंपनीच्या मान्यताप्राप्त पेन्शन फंडात भरलेली वर्गणी मात्र सदरची रक्कम परत मिळाल्यावर त्या-त्या वर्षात करपात्र म्हणून धरण्यात यावी.

**23)** **<u>राजीव गांधी निधी कलम ८० सी.सी.झी. प्रमाणे</u>** ज्यांचे वार्षिक उत्पन्न १० लाख किंवा त्याहून कमी असल्यास त्यांनी केलेल्या शेअर खरेदी ( आयकर कायद्यानुसार ज्यांनी कंपनीचे शेअर मान्यता प्राप्त आहेत.) त्याच्यात ५०% वजावट किंवा जास्तीत जास्त रक्कम रु. ५०,०००/- मिळेल.

**कलम ८० सी., ८० सी.सी.सी. व ८०सीसीडी नुसार (वरील मुद्दा क्र.५ मधील १ ते २३) या सर्वाची मिळून एकूण वजावटीची कमाल मर्यादा र.रु.१.५ लाख पर्यंतची असून अशी गुंतवणूक कलम ८० सी खालील सर्व योजनात मिळून अथवा कोणत्याही एका योजनेत गुंतवली तरी त्याला र.रु.१.५ लाख पर्यंत वजावट मिळेल.) तसेच पगार वैयक्तिक वजावटी करीता वजावटीचे कागदपत्राचे सत्यप्रत सादर करणे बंधनकारक आहे. यासंबधीची कागदपत्रे संबधित विभागाने जतन करणेत यावी.**

## <u>6)</u> <u>चॅप्टर VIA नुसार कलम ८० च्या अन्य वजावटी :-</u>

**<u>1)</u>** **<u>मान्यता प्राप्त संस्थांना दिलेल्या देणग्या :-</u>** जर कर्मचा-यांने <u>कलम ८० जी</u> खाली मान्यता असलेल्या लोकोपयोगी संस्थांना देणगी दिली असेल तर व ही देणगी **<u>कलम ८० जी (१) अन्वये</u>** पंतप्रधान निधी, भुकंप निधी, मुख्यमंत्री निधी, फ्लॅग डे, **National fund for control of drug abuse, swachh bharat kosh & clean ganga fund.** इ. साठी दिली असेल तर १००**%** व अन्य मान्य फंडात दिली असेल तर **<u>कलम ८० जी (२)</u>** नुसार ५०**%** वजावटीस पात्र राहिल. मात्र सदरची देणगी एकूण पगाराच्या १०**%** पर्यंतच विचारात घ्यावी.

२**) अपंगाना मिळणारी सूट :-** (**Permanent Physical Disability)** जर कर्मचारी स्वत: अपंग असेल तर त्याला **<u>कलम ८० यु</u>** प्रमाणे र.रु.७५,०००/- वजावट मिळेल मात्र हे अपंगत्व तीव्र **(Severe Disability)** असेल तर अशी वजावट र.रु.१,२५,०००/- मिळेल. मात्र असा कर्मचारी पूर्णपणे किंवा अधिकांश अंध असेल किंवा कायमचा शारीरीक अंपग असेल किंवा मतिमंद असेल किंवा मूकबधिर असेल, ऑरिझम, सेरिबल पल्सी किंवा विविधांगी विकलांगतेने ग्रस्त असेल आणि त्याने आयकर नियमांच्या **<u>नियम ११ डी</u>** प्रमाणे सक्षम वैद्यकिय अधिका-यांचे प्रमाणपत्र सादर केले असेल तरच ही वजावट विचारात घ्यावी.

३**)** **<u>वैद्यकीय विम्याचे हप्ते :-</u>** जर कर्मचारी स्वत:चा अगर वैवाहीक साथीदाराचा, त्याच्यावर अवलंबुन असलेले अपत्ये यांच्या वैद्यकिय विम्याचे हप्ते भरत असेल तर त्याला **<u>कलम ८० डी</u>** नुसार र.रु.२५,०००/- पर्यंत वजावट मिळेल. ज्या व्यक्तीचा हप्ता भरत असेल ती व्यक्ती ६० वर्षावरील जेष्ठ नागरीक असेल तर ही वजावट र.रु.३०,०००/- पर्यंत देय राहील. जर कर्मचा-याने त्यांचे फलकांचे वैद्यकीय विम्याचे हप्ते भरत असेल तर त्याला कलम ८० डी नुसार र.रु.२५,०००/- पर्यंत

वजावट मिळेल जर पालकांचे वय ६० पेक्षा जास्त असेल तर ही वजावट र.रु. ३०,०००/- पर्यंत देय राहील. मात्र अशा हस्याची रक्कम रोख स्वरुपात **(Cash)** भरलेली असेल तर विचारात घेवू नये फक्त धनादेश अथवा अन्य मार्गाने भरलेली रक्कमच विचारात घ्यावी.

४) **<u>अपंग नातेवाईकाचा वैद्यकिय खर्च किंवा त्यांच्या कल्याणकारी योजनेत ठेवलेली रक्कम :-</u>** कर्मचा-याने अपंग नातेवाईकाच्या ट्रिटमेंट, ट्रेनिंग त्याचप्रमाणे त्यांच्या हितार्थ विशिष्ट योजनेत ठेवलेल्या रक्कमेवर **<u>कलम ८० डी डी</u>** नुसार र.रु. ७५,०००/- पर्यंत वजावट मिळेल. असे अपंगत्व हे तीव्र अपंगत्व **(Severe Disability ८०%** पेक्षा जास्त) असेल तर र.रु १,२५,०००/- पर्यंत वजावट मिळेल. मात्र अशी अपंग व्यक्ती कर्मचा- यांचे नातेवाईक असली पाहिजे व त्याची संपूर्ण जबाबदारी कर्मचा- यांवर असली पाहिजे. अपंग व्यक्ती आयकर नियमाच्या **<u>नियम ११ अ</u>** प्रमाणे कायमची अपंग व्यक्ती कर्मचा-याला नातेवाईक असली पाहिजे व त्याची संपूर्ण जबाबदारी कर्मचा- यांवर असली पाहिजे व असे अपंगत्व सरकारी सक्षम वैद्यकिय तज्ञाने प्रमाणित केलेले असले पाहिजे व त्यांच्यासाठी प्रत्यक्ष खर्च अथवा ठेव ठेवलेली असली पाहिजे.

५) **<u>शैक्षणिक कर्जावरील व्याज :-</u>** कर्मचा-याने (पती/पत्नी/अपत्य/स्वत: ) च्या उच्च शिक्षणासाठी आर्थिक संस्थाकडून अथवा मान्यता प्राप्त धर्मादाय संस्थेकडून कर्ज घेतले असेल तर त्याला **<u>कलम ८० ई</u>** प्रमाणे दिलेले फक्त **व्याज** पूर्णपणे माफ मिळेल मात्र कर्मचा-याने स्वत:च्या अथवा स्वत:वर अवलंबून असलेल्या एका मुलांसाठी त्याच्या उच्च शिक्षणासाठीच असे कर्ज घेतले पाहिजे. कर्जाची मुद्दल विचारात घेवू नये.

६) **<u>कलम १० (१३ ऐ) घरभाडे भत्ता :-</u>** जर नियोक्त्याने कर्मचा-यास निवासी वापरासाठीच्या घराचे भाडयाची प्रतिपूर्ती करण्यासाठी विशेष भत्ता मंजूर केला असल्यास घरभाडे भत्यासाठी **<u>नियम २ ऐ</u>** नुसार खालीलपैंकी **<u>कमी असणा-या रकमेची वजावट</u>** मिळेल**.**

अ) जर निवासी घर मुबंई, कलकत्ता, दिल्ली किंवा मद्रास येथे असल्यास वेतनाच्या ५०**%** व इतर ठिकाणी निवासी घर असलेस वेतनाचे ४०**%** इतकी रक्कम.

ब) ज्या कालावधीत कर्मचा-याने भाडयाने निवासी स्थान घेतलेले असेल त्या कालावधीत त्याला मिळालेला घरभाडे भत्ता

क) वेतनाचे १०**%** पेक्षा जास्त दिलेले घरभाडे.

**वेतन :-** वेतन म्हणजे मूळ वेतन अधिक (+) महागाई भत्ता तसेच याशिवाय काही कमिशन ठरलेले असेल तर त्याची रक्कम.

**नोट :-** जर कर्मचा-याचे कामाचे ठिकाणाचे परिसरात त्याचे नावे अथवा पतीचे / पत्नीचे नावे निवासी घर/ मिळकत असेल अथवा कर्मचारी राहत असलेल्या घराचे भाडे देत नसेल तर अशा प्रकरणी ही सवलत देय नाही.

७) **<u>जास्त दिलेल्या घरभाडयात सूट :-</u>** जर कर्मचा-याला घरभाडे भत्ता मिळत नसेल व त्याला एकूण वार्षिक उत्पन्नाच्या १०**%** पेक्षा जास्त भाडे द्यावे लागत असेल तर त्याला **<u>कलम ८० जी.जी.</u>** नुसार जादा दिलेल्या भाडयात दरमहा र.रु.२,०००/- किंवा समायोजन उत्पन्नाच्या (एकूण उत्पन्न वजा जाता इतर वजाती यामध्ये ८० जी.जी.सोडून) २५**%** यापैंकी कमी रक्कम या कमाल मर्यादेपर्यंत वजावट देता येईल. (ही वजावट मिळण्यासाठी क्र. **१० बी.ए. हा फॉर्म भरून रिटर्न** सोबत देणे आवश्यक आहे.) मात्र जर त्या कर्मचा-यांच्या स्वत:च्या मालकीचे पती व पत्नीचे, अज्ञान मुलांचे किंवा एकत्र कुंटुंबाचे घर नोकरीच्या किंवा नेहमी राहतो त्या ठिकाणी असेल अथवा स्वत:च्या मालकीचे घर अन्य ठिकाणी असून त्याच्या वापरात असेल तर ही वजावट मिळणार नाही.

८) **<u>अन्य वजावटी :-</u>** जर करदात्याचे स्वत:च्या किंवा अवलंबून असलेल्या नातेवाईकांच्या मेंदूचे रोग, पार्किंसन्स डिसीज, कॅन्सर, एडस् यासारख्या विशिष्ट आजारातील वैद्यकिय उपचारासाठी खर्च केला असल्यास **<u>कलम ८० डी.डी.बी.</u>** नुसार र.रु.

४०,०००/- व जेष्ठ नागरिकांसाठी र.रु.६०,०००/- पर्यत वजावट मिळेल.तसेच वय वर्ष ८० पेक्षा जास्त असलेस ती वजावट र.रु. ८०,०००/- पर्यंत वजावट मिळेल.

वरील प्रमाणे मुद्दा क्र. १ मधील निश्चित केलेल्या उत्पन्नातून मुद्दा क्र.२ ते ८ मधील विविध वजावटी असतील त्या विचारात घेऊन करकपातीला पात्र उत्पन्न निश्चित करावे. अशा करकपातीला पात्र असणा-या उत्पन्नावर परिपत्रकातील परिच्छेद १मध्ये नमूद केलेल्या दराने देय आयकर काढून त्यावर ३**%** प्रमाणे एज्युकेशन सेसची आकारणी करावी व कर्मचा-यांचा वर्षाचा कपात करावा लागणारा **एकूण आयकर निश्चित करुन असा आयकर दरमहा समान १२ हस्यात कपात करावा.**

**आहरण-वितरण अधिका-यांची कर्तव्ये व जबाबदा-या**

**१) Permanent Account Number ( P.A.N.) :-**

आयकर कायदा कलम १३९ A नुसार ज्या कर्मचा-यांचे उत्पन्न आयकरपात्र आहे अशा प्रत्येक कर्मचा-याने P.A.N. क्रमांक घेणे बंधनकारक असल्याने अशा प्रत्येक कर्मचा-यास P.A.N. क्रमांक घेणेच्या सूचना देवून त्यांनी घेतलेल्या P.A.N. क्रमाकांच्या पत्राची झेरॉक्स प्रत विभागाकडे ठेवावी व आयकर कपातीचे शेडयुल, पगार बिल शेडयुल, करकपातीचे प्रमाणपत्र इ. ठिकाणी अचूक P.A.N. क्रमांक नमूद करावा. **( P.A.N. क्रमांक नसणे अथवा चुकिचा P.A.N. क्रमांक नमूद करणे यासाठी आयकर कायदा कलम २७२ B नुसार रु. १०,०००/- दंडाची तरतूद आहे.)**

**२) Tax Deduction Account Number ( T.A.N.) :-**

आयकर कायदा २०३ A नुसार प्रत्येक आहरण-वितरण अधिकारी याने स्वतंत्र T.A.N. क्रमांक घेवून तो आयकर भरणा चलन, आयकर कपात प्रमाणपत्र, आयकर रिटर्न इत्यादी ठिकाणी अचूक नमुद करणे आवश्यक आहे. **(T.A.N. क्रमांक नसणे अथवा चुकिचा T.A.N. क्रमांक नमुद करणे यासाठी आयकर कायदा कलम २७२ BB नुसार रु. १०,०००/- दंडाची तरतुद आहे )**

**३) समान हस्यात आयकर कपात करणे :-**

आयकरपात्र कर्मचा-यांचा एकुण वर्षाचा देय होणारा आयकर निश्चित केल्यानंतर त्याची आयकर कायदा **कलम १९२ (१)** नुसार समान हस्यात वसुली करणे आवश्यक असुन अशी कपात करताना पगार बिलांसोबतच्या आयकर वजाती तक्त्यामध्ये कपात केलेल्या रकमेपैकी आयकर रक्कम किती व एज्युकेशन सेसची रक्कम किती ? हे स्वतंत्र नमुद करणे आवश्यक आहे.

**( आयकर समान हस्यात वसुल न करणेसाठी आयकर कायदा कलम २०१ (१अ) मध्ये १२% प्रमाणे कपात न केलेल्या रकमेवर व्याज आकारणेची तरतूद आहे.)**

**४) कपात केलेल्या आयकराचा भराणा ITNS 281 या चलनाद्वारे बँकेमार्फत आयकर विभागास करणे :-** पगारातून कपात केलेला आयकराचा धनादेश आयकर भरणा चलन क्र. **ITNS 281** या विहित नमुन्यातील चलनाद्वारे शक्यतो ज्या महिन्याला कापला आहे त्याच्या शेवटच्या दिवसापासून जास्तीत जास्त ७ दिवसांत बँकेमार्फत आयकर विभागास भरणे आवश्यक आहे. त्यामुळे भरणा मुदती करुन भरणा बँकेकडून मिळणारी चलनाची स्थळप्रत लेखा विभागास तात्काळ दाखवून ज्या-त्या विभागाकडे जपून ठेवावी. तसेच भरणा करताना त्यामध्ये T.A.N.क्रमांक , धनादेश क्रमांक, दिनांक, रक्कम, आकारणी वर्ष, आयकराची रक्कम, एज्युकेशन सेसची रक्कम अचुक नमुद केली जावी. **( कपात आयकराचा भरणा आयकर विभागास न करणे अथवा विलंबाने करणे यासाठी आयकर कायदा कलम २०१, २७१ सी व २७६ B नुसार कारावास तसेच दंडाची तरतूद आहे.)**

**५) संगणक माध्यमातून ( e-TDS ) फॉर्म क्र. २४ Q मधील त्रैमासिक / वार्षिक अहवाल सादर करणे :-** प्रत्येक आहरण–वितरण अधिका-याने कपात करुन भरणा केलेल्या आयकराबाबतचा फॉर्म क्र. २४ Q मधील विहीत नमुन्यातील त्रैमासिक अहवाल संगणक माध्यमातून N.S.D.L ( National Security Depository Ltd ) च्या अधिकृत TIN (Tan Information Network ) Facilitation Centre कडे मुदतीत सादर करणे बंधनकारक आहे.

१) ३० जून अखेरचा **१ ला त्रैमासिक अहवाल १५ जुलैपर्यंत**
२) ३० सप्टेंबर अखेरचा **२ रा त्रैमासिक अहवाल १५ ऑक्टोंबरपर्यंत**
३) ३१ डिसेंबर अखेरचा **३ रा त्रैमासिक अहवाल १५ जानेवारीपर्यंत**
४) ३१मार्च अखेरचा ४ **था त्रैमासिक / वार्षिक एकत्रित अहवाल १५ मे पर्यंत**

सादर करावयाचा आहे अशा प्रकारे सादर केलेल्या. अहवालाची N.S.D.L च्या TIN Facilitation Centre कडुन मिळणा-या पावतीची (Provisional Receipt) झेरॉक्स प्रत त्रैमासिक अहवाल सादर करण्याची मुदत संपल्यानंतर येणा-या पुढील पगार बिलासोबत लेखा शाखेस पाठवावी व मुळ प्रत विभागाकडेच जपून ठेवावी.

पहिल्या तीन त्रैमासिक अहवालामध्ये त्या–त्या तिमाहीमध्ये कपात केलेल्या आयकर सादर करावयाची असुन शेवटच्या व अंतिम त्रैमासिक अहवालामध्ये संपुर्ण वर्षाचे उत्पन्न, घेतलेल्या वजावटी कपात केलेल्या आयकर / एज्युकेशनसेस याबाबतची सविस्तर व अचुक माहिती सादर करावयाची आहे. सदरचे अहवाल सादर करताना त्यामध्ये आहरण–वितरण अधिका-याचा TAN क्रमांक व कर्मचा-यांचा P.A.N क्रमांक अचुक नमुद करणे आवश्यक आहे.

**संगणक माध्यमातून सदरचे विहित नमुन्यातील अहवाल सादर करण्यासाठी स्वतंत्र संगणक प्रणाली / सॉफ्टवेअरची आवश्यकता नसून हे अहवाल N.S.D.L ने विकसित केलेल्या Return Preparation Utility – R.P.U. चा वापर करुन भरता येतील. सदरची सुविधा N.S.D.L च्या वेबसाईटवर मोफत उपलब्ध आहे.** सदर वेबसाईटवर सदरचे अहवाल कसे तयार करावयाचे तसेच आयकराबाबतच्या सुचनाही दिलेल्या असुन त्याचा अभ्यास करुन सदरचे अहवाल वेळच्या वेळी व बिनचूक सादर करणे आवश्यक आहे.

सदर अहवाल सादर करण्यासाठी संगणक उपलब्ध नसणे, संगणकावर इंटरनेट सुविधा उपलब्ध नसणे, संगणकावर N.S.D.L ने विकसित केलेली मोफत सुविधा डाऊनलोड न होणे, तयार केलेली फाईल व्हॅलीडेट न होणे यासारख्या तांत्रिक अडचणी संगणक विभागाची मदत घेऊन दूर कराव्यात, प्रत्येक ठिकाणी इंटरनेट सुविधा उपलब्ध करुन देणे शक्य नसल्यास संगणक विभागाच्या मदतीने ज्या उपविभागाकडे इंटरनेट सुविधा उपलब्ध नाही अशा विभागांनी शक्यतो त्यांच्या मुख्य विभागातील संगणकावरील इंटरनेट सुविधेचा वापर करावा. उदा :- विविध करसंकलन विभागीय कार्यालयांनी करसंकलन मुख्य कार्यालय, विविध दवाखान्यांनी वैद्यकीय मुख्य कार्यालय अथवा कै. Y.C.M.रुग्णालय, विविध माध्य.विद्यालयांनी माध्य .शिक्षण विभाग इ.ठिकाणाच्या इंटरनेट सुविधा असलेल्या संगणकाचा वापर करावा. ( **सदरचे त्रैमासिक अहवाल मुदतीत सादर न केल्यास विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु. २००/- प्रमाणे दंडात्मक कारवाई करण्याची आयकर कायदा 272 A (2) (k) मध्ये तरतूद आहे.)**

६) **फॉर्म क्र. १६ मधील करकपातीचे प्रमाणपत्र देणे:-**

आयकर कायदा कलम २०३ नुसार कर्मचा-याला आयकराबाबतचे करकपातीचे प्रमाणपत्र (फॉर्म नं.१६) प्रत्येक आर्थिक वर्ष संपलेनंतर ३१ मे पर्यंत देणे बंधनकारक आहे.

**(करकपातीचे प्रमाणपत्र न दिल्यास आयकर कायदा कलम २७२ A नुसार विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु. २००/- प्रमाणे दंडात्मक कारवाईची तरतूद आहे.)**

कर्मचा-यास फॉर्म नं. १६ मधील प्रमाणपत्र देताना कर्मचारी संबंधित आहरण- वितरण अधिका-याकडे आर्थिक वर्षात जेवढा कालावधी कार्यरत होता त्या कालावधीचे फॉर्म नं १६ मधील प्रमाणपत्र देणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यामुळे संबंधित आहरण – वितरण अधिका-यांनी ज्या ज्या आर्थिक वर्षात संबंधित कर्मचा-यास त्याने त्या विभागात काम केलेल्या कालावधीचे अदा केलेल्या वेतनाचे फॉर्म नं . १६ मधील प्रमाणपत्र देऊन त्याची प्रत संबंधित कर्मचा-याची ज्या

विभागाकडे बदली झाली त्या विभागास त्याचे अंतिम वेतन प्रमाणपत्रासोबत (L.P.C.) पाठविण्यात यावी. फॉर्म नं. १६ पार्ट ए. हे traces या वेब साईट वरून घ्यावी.

**७)** आयकर कायदया नुसार कर्मचा-याला / अधिका-याला पगारासोबत सोयी /सवलत घेतलेल्या सेवाचे मुल्यांकनाची माहिती देणारा फॉर्म १२ बी.ए. कर्मचारी /अधिकारी यांनी देणे बंधनकारक आहेत.

**८) <u>वैयक्तिक आयकर रिटर्न दाखल करणे:-</u>**

प्रत्येकांनी त्यांची वैयक्तिक आयकर रिटर्न आर्थिक वर्ष संपलेनंतर ३१ जुलै पर्यंत आयकर विभागास दाखल करणे बंधनकारक आहे. वैयक्तिक आयकर रिटर्न दाखल करताना ते फॉर्म नं . **ITR -1** ते **ITR – 2** फॉर्म या विविध फॉर्ममध्ये दाखल करणे बंधनकारक केलेले आहे.

**ITR -1 :-** ज्या पगारदार करदात्याला केवल पगार, बँक व्याज ( बचत खाते, मुदत ठेव इ.चे ) तसेच शेतीचे उत्पन्न, घर बांधणी वरील व्याज इत्यादी असेल त्यांनी **ITR -1** या फॉर्ममध्ये वैयक्तिक आयकर रिटर्न दाखल करावयाची आहेत.

**ITR -2 :-** ज्या पगारदार करदात्याला पगार, बँक व्याज, (बचत खाते, मुदत ठेव इ. चे ) शेतीचे उत्पन्न, घरापासून भाडयाचे उत्पन्न,भांडवली नफा, डिव्हीडंड,यंत्रसामुग्री भाडे Plant & Machinery) इमारत भाडे, यासारख्या मार्गाने उत्पन्न मिळाले असेल **ITR -2** या फॉर्ममध्ये वैयक्तिक आयकर रिटर्न दाखल करावयाची आहेत.

आयकर रिटर्न फॉर्म क्र. **ITR -3** ते **ITR -8** हे अन्य मार्गाने उत्पन्न असणा-या व्यवसायिक, भागिदारी फर्म, यासारख्या करदात्यांसाठी असून सर्वसाधरणपणे ते म.न.पा कर्मचा-यांना लागू होत नाहीत. तथापि **ITR -1** ते **ITR -8** या रिटर्न फॉर्मचे नमूने व ते भरावयाचे मार्गदर्शक सूचना आयकर विभागाच्या **<u>www.incometaxindia.gov.in /</u>** **<u>www.incometaxindiaefiling.gov.in</u>** या वेबसाईटवर उपलब्ध असून, त्याचा अभ्यास करुन आवश्यक त्या फॉर्ममध्ये संबंधितांनी त्याची आयकर रिटर्न मुदतीत दाखल करावयाची आहेत. सुधारीत फॉर्म मध्ये आयकर रिटर्न दाखल करताना त्यासोबत इतर कागदपत्रे जोडण्याची आवश्यकता नाही. संबंधित आहरण-वितरण अधिकारी यांनी त्याप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना व संपुर्ण मार्गदर्शन सर्व संबंधित कर्मचा-यांना करुन सर्व कर्मचा-यांनी त्याप्रमाणे मुदतीत आयकर रिटर्न दाखल केले आहे याची खातरजमा करावी व त्याबाबतचे रेकॉर्ड त्यांचे विभागाकडे ठेवावे. त्याचप्रमाणे **<u>कर्मचा-यांची वैयक्तिक आयकर रिटर्नमध्ये चुकिच्या वजावटी दाखवून आयकर सवलत / Refund घेतल्यास संबंधितांस चुकविलेल्या कराच्या ३००% पर्यंत दंड तसेच ३ ते ७ वर्षापर्यंत कारावसाची सजा आयकर कायदयाप्रमाणे होऊ शकते याची जाणीव सर्व संबंधित कर्मचा-यांना करुन द्यावी.</u>**

आयकर कायदयातील तरतूदी, त्यामध्ये झालेले बदल , सादर करावयाचे अहवाल, याबाबत आयकर कायदयातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्याची व मुदतीत कार्यवाही न केल्यास आयकर कार्यालयाकडून होणा-या कारवाईची जबाबदारी वैयक्तिकरित्या संबंधित आहरण-वितरण अधिका-यांची राहणार आहे. सबब, त्यांनी लेखा विभागाकडील सूचना प्राप्त होण्याची वाट न पाहता आयकर कायदयातील तरतूदी, त्यामध्ये झालेले बदल, वेळोवेळी सादर करावयाचे अहवाल याबाबतची माहिती करुन, आयकर सल्लागार यांचे मार्गदर्शन घेवून तसेच आयकर विभाग व N.S.D.L. चे वेबसाईटवर सुचनांचा अभ्यास करुन आयकर विषयक नियमाधिन कार्यवाही वेळच्या वेळी करण्याचे दक्षता घ्यावी.

**दंड आणि कारवाई :-**

**१) व्याज u/s २०१ ( १ A ) :-**

**a)** आयकर न कापल्यास, कमी कापल्यास असलेल्या रकमेच्या १% व्याज दरमहा भरावा लागेल

**b)** आयकर कापल्यास आणि न भरल्यास किंवा कमी भरल्यास असलेल्या रकमेच्या१.५% व्याज दरमहा भरावा लागेल.

**२) दंड u/s२२१:-** आयकर न कापल्यास,कमी कापल्यास असलेल्या रकमेइतका दंड आकारण्यात येईल व भरावा लागेल.

३) **कारवाई u/s २७६ (B) :-** आयकर न भरल्यास सक्त मजुरी कमीत कमी ३ महिने ते ७ वर्षापर्यंत होऊ शकते.

४) **कारवाई u/s २७७ :-** चुकिची माहिती रिटर्न मध्ये फाईल केल्यास सक्त मजुरी कमीत कमी ३ महिने ते ७ वर्षापर्यंत होऊ शकते. कर्मचा-यांचे / अधिका-यांचे एकूण उत्पन्न विचारात घेताना त्यांना दिल्या जाणा-या विविध वजावटीचे पुरावे देणे हे आयकर कायदयानुसार संबधितांना बंधनकारक करणेत आले आहे.

महापालिकेच्या आयकर, विक्रीकर, सेवाकर यासारख्या करविषयक कामकाजासाठी सनदी लेखापाल (चार्टर्ड अकाऊंट ) यांची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली असून त्यांचे नांव, दूरध्वनी क्रमांक, आसन व्यवस्था इ. बाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**श्री. सतिश नगरे, सनदी लेखापाल यांचे प्रतिनिधी सी.ए. ऋतुराज / स्वरुप**

**आसन व्यवस्था :-** मुख्य प्रशासकीय इमारतीतील निवडणूक कार्यालयाशेजारी दुहेरी नोंद कक्षात

**दूरध्वनी क्रमांक –** ७५८८५७६६५८ /७५८८५७६६५९/ ९५६१४७१४५८.

**विस्तारीत दूरध्वनी क्रमांक –**

सबब, आयकर विषयक कामकाज करताना त्यांचेशी सतत संपर्कात राहून काही शंका /अडचणी आल्यास त्यांचा सल्ला / मार्गदर्शन / अभिप्राय घेवून आयकर विषयक वेळचेवेळी, मुदतीत व बिनचूक करण्याची योग्य ती दक्षता घ्यावी.

**सोबत १) मे. श्री. सतिश नगरे, सनदी लेखापाल यांचे दि. ३/८/२०१५ रोजीचे आयकर विषयक झालेले बदल यांचे पत्र**

**२) फॉर्म क्रमांक – १६ ची प्रत**

**३) फॉर्म क्रमांक – १२ बी.ए.चा. नमुना**

**४) ITNS 281 भरणा चलनाची नमुना प्रत चा नमुना आपले अधिक माहितीसाठी देत आहे.**

**मुख्यलेखापाल**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८

**प्रति,**

१) सर्व संबंधित आहरण - वितरण अधिकारी
---------------------------------- विभाग

२) सर्व संबंधित विभाग प्रमुख / प्रभाग अधिकारी
---------------------------------- विभाग

**प्रत,**

१) मा. आयुक्त सो.
२/- माहितीसाठी सविनय सादर

२) मा. अति. आयुक्त
२/- माहितीसाठी सविनय सादर

**लेखाधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८

## FORM NO. 16

[See rule 31(1)(a)]

### PART A

**Certificate under section 203 of the Income-tax Act, 1961 for Tax deducted at source on Salary**

| Name and address of the Employer | | Name and designation of the Employee |
|---|---|---|
| | | |
| PAN of the Deductor | TAN of the Deductor | PAN of the Employee |
| | | |

| CIT (TDS) | Assessment Year | Period | |
|---|---|---|---|
| THE COMMISSIONER OF INCOME TAX (TDS) | | From | To |
| | | | |

**Summary of tax deducted at source**

| Quarter | Receipt Numbers of original statements of TDS under sub-section (3) of section 200 | Amount of tax deducted in respect of the employee | Amount of tax deposited/remitted in respect of the employee |
|---|---|---|---|
| Quarter 1 | | | |
| Quarter 2 | | | |
| Quarter 3 | | | |
| Quarter 4 | | | |
| **Total** | | | |

### Part B (Refer Note 1)

**Details of Salary paid and any other income and tax deducted**

1. Gross Salary
   (a) Salary as per provisions contained in section 17(1)
   (b) Value of perquisites under section 17(2) (as per Form No. 12BA, wherever applicable)
   (c) Profits in lieu of salary under section 17(3) (as per Form No. 12BA, wherever applicable)
   (d) Total
2. Less: Allowance to the extent exempt under section 10
3. Balance (1-2)
4. Deductions:
   (a) Entertainment allowance
   (b) Tax on employment
5. Aggregate of 4(a) and (b)
6. Income chargeable under the head 'salaries' (3-5)
7. Add: Any other income reported by the employee
8. Gross total income (6 + 7)
9. Deductions under Chapter VIA
   (A) Sections 80C, 80CCC and 80CCD — Gross Amount | Deductible Amount
      (a) Section 80C
      (b) Section 80CCC
      (c) Section 80CCD
   (B) Other Sections under Chapter VIA — Gross Amount | Qualifying Amount | Deductible Amount
      (a)
10. Aggregate of deductible amount under Chapter VIA
11. Total income (8 - 10)
12. Tax on total income
13. Education cess @ 3% (on tax at S. No. 12)
14. Tax payable (12+13)
15. Less : Relief under section 89 (attach details)
16. Tax payable (14-15)

### Verification

I, ____________________, son/daughter of ____________________ working in the capacity of ____________ (designation) do hereby certify that a sum of Rs. __________ [Rs. ________________ (in words)] has been deducted and deposited to the credit of the Central Government. I further certify that the information given above is true, complete and correct and is based on the book of accounts, documents, TDS statements, TDS deposited and other available records.

| | |
|---|---|
| Place | |
| Date | |
| Designation: | Signature of person responsible for deduction of tax |
| | Full Name: |

## ANNEXURE-A

### DETAILS OF TAX DEDUCTED AND DEPOSITED IN THE CENTRAL GOVERNMENT ACCOUNT THROUGH BOOK ENTRY

(The Employer to provide payment wise details of tax deducted and deposited with respect to the employee)

| S. No. | Tax Deposited in respect of the Employee (Rs.) | Book identification number (BIN) | | |
|---|---|---|---|---|
| | | Receipt numbers of Form No. 24G | DDO Sequence Number in the Book Adjustment Mini Statement | Date on which tax deposited (dd/mm/yyyy) |
| | | | | |
| | | | | |
| Total | | | | |

## ANNEXURE-B

### DETAILS OF TAX DEDUCTED AND DEPOSITED IN THE CENTRAL GOVERNMENT ACCOUNT THROUGH CHALLAN

(The Employer to provide payment wise details of tax deducted and deposited with respect to the employee)

| S. No. | Tax Deposited in respect of the employee (Rs.) | Challan identification number (CIN) | | |
|---|---|---|---|---|
| | | BSR Code of the Bank Branch | Date on which tax deposited (dd/mm/yyyy) | Challan Serial Number |
| | | | | |
| | | | | |
| Total | | | | |

# FORM NO. 12BA

[See Rule 26A(2)(b)]

Statement showing particulars of perquisites, other fringe benefits or amenities and profits in lieu of salary with value thereof

1. Name and address of employer:
2. TAN
3. TDS Assessment Range of the employer:
4. Name, designation and PAN of employee:
5. Is the employee a director or a person with substantial interest in the company (where the employer is a company):
6. Income under the head "Salaries" of the employee (other than from perquisites):
7. Financial Year:
8. Valuation of perquisites:

| S.No. | Nature of perquisite (see rule 3) | Value of perquisite as per rules (Rs.) | Amount, if any, recovered from the employee (Rs.) | Amount of perquisite chargeable to tax [Col.(3)-Col.(4)] (Rs.) |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| 1. | Accommodation | | | |
| 2. | Cars/Other automotive | | | |
| 3. | Sweeper, gardener, watchman or personal attendant | | | |
| 4. | Gas, Electricity, Water | | | |
| 5. | Interest free or concessional loans | | | |
| 6. | Holiday expenses | | | |
| 7. | Free or concessional travel | | | |
| 8. | Free meals | | | |
| 9. | Free education | | | |
| 10. | Gifts, vouchers, etc. | | | |
| 11. | Credit card expenses | | | |
| 12. | Club expenses | | | |
| 13. | Use of movable assets by employees | | | |
| 14. | Transfer of assets to employees | | | |
| 15. | Value of any other benefit/amenity/service/privilege | | | |
| 16. | Stock options (non-qualified options) | | | |
| 17. | Other benefits or amenties | | | |
| 18. | Total value of perquisites | | | |
| 19. | Total value of profits in lieu of salary as per section 17(3) | | | |

9. Details of Tax -
   (a) Tax deducted from salary of the employee under section 192(1)
   (b) Tax paid by employer on behalf of the employee under section 192(1A)
   (c) Total tax paid
   (d) Date of payment in Government treasury

**Declaration by employer**

I __________ s/o __________ working as __________ do hereby declare on behalf of __________ (name of the employer) that the information given above is based on the books of account, documents and other relevant records or information available with us and the details of value of each such perquisite are in accordance with section 17 and rules framed thereunder and that such information is true and correct.

Signature of the persons responsible for deduction of tax

Place :
Date :

Full Name :
Designation :

* Important : Please see notes overleaf before filling up the challan

# T.D.S./TCS TAX CHALLAN

Single Copy (to be sent to the ZAO)

| CHALLAN NO./ ITNS 281 | **Tax Applicable** (Tick One)* TAX DEDUCTED/COLLECTED AT SOURCE FROM | Assessment Year |
|---|---|---|
| | (0020) COMPANY DEDUCTEES ☐ (0021) NON-COMPANY DEDUCTEES ☐ | ☐☐☐☐ - ☐☐ |

Tax Deduction Account No. (T.A.N.)

Full Name

Complete Address with City & State

Tel. No. Pin

**Type of Payment** **Code ***

(Tick One) (Please see overleaf)

TDS/TCS Payable by Taxpayer (200)

TDS/TCS Regular Assessment (Raised by I.T. Deptt.) (400)

**FOR USE IN RECEIVING BANK**

Debit to A/c / Cheque credited on

D D M M Y Y

**SPACE FOR BANK SEAL**

| DETAILS OF PAYMENTS | Amount (in Rs. Only) |
|---|---|
| Income Tax | |
| Surcharge | |
| Education Cess | |
| Interest | |
| Penalty | |
| Total | |
| Total (in words) | |

| CRORES | LACS | THOUSANDS | HUNDREDS | TENS | UNITS |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

Paid in Cash/Debit to A/c /Cheque No. Dated

Drawn on

(Name of the Bank and Branch)

Date:

Signature of person making payment

Rs.

**Taxpayers Counterfoil** (To be filled up by taxpayer)

**SPACE FOR BANK SEAL**

TAN

Received from

(Name)

Cash/ Debit to A/c /Cheque No. For Rs.

Rs. (in words)

drawn on

(Name of the Bank and Branch)

Company/Non-Company Deductees

on account of Tax Deducted at Source (TDS)/Tax Collected at Source (TCS) from _____(Fill up Code)

(Strike out whichever is not applicable)

for the Assessment Year ☐☐☐☐ - ☐☐

Rs.

*NOTES

1. Please note that quoting false TAN may attract a penalty of Rs. 10,000/- as per section 272BB of I.T. Act, 1961.
2. Use a Separate Challan for each Nature (Type) of Payment. The relevant Codes are:

| *Section* | *Nature of Payment* | *Code* | | |
|---|---|---|---|---|
| 192 | Payment to Govt. Employees other than Union Government Employees | 9 | 2 | A |
| 192 | Payment of Employees other than Govt. Employees | 9 | 2 | B |
| 193 | Interest on securities | 1 | 9 | 3 |
| 194 | Dividend | 1 | 9 | 4 |
| 194A | Interest other than interest on securities | 9 | 4 | A |
| 194B | Winnings from lotteries and crossword puzzles | 9 | 4 | B |
| 194BB | Winnings from horse race | 4 | B | B |
| 194C | Payment of contractors and sub-contractors | 9 | 4 | C |
| 194D | Insurance Commission | 9 | 4 | D |
| 194E | Payments to non-resident Sportsmen/Sport Associations | 9 | 4 | E |
| 194EE | Payments in respect of Deposits under National Savings Schemes | 4 | E | E |
| 194F | Payments on account of Re-purchase of Units by Mutual Funds or UTI | 9 | 4 | F |
| 194G | Commission, prize etc., on sale of Lottery tickets | 9 | 4 | G |
| 194H | Commission or Brokerage | 9 | 4 | H |
| 194I | Rent | 9 | 4 | I |
| 194J | Fees for Professional or Technical Services | 9 | 4 | J |
| 194K | Income payable to a resident assessee in respect of Units of a specified Mutual Fund or of the Units of the UTI | 9 | 4 | K |
| 194LA | Payment of Compensation on acquisition of certain immovable property | 9 | 4 | L |
| 195 | Other sums payable to a non-resident | 1 | 9 | 5 |
| 196A | Income in respect of units of Non-Residents | 9 | 6 | A |
| 196B | Payments in respect of Units to an Offshore Fund | 9 | 6 | B |
| 196C | Income from foreign Currency Bonds or shares of Indian Company payable to Non-Resident | 9 | 6 | C |
| 196D | Income of foreign institutional investors from securities | 9 | 6 | D |
| 206C | Collection at source from Alcoholic Liquor for Human Consumption | 6 | C | A |
| 206C | Collection at source from Timber obtained under Forest lease | 6 | C | B |
| 206C | Collection at source from Timber obtained by any Mode other than a Forest Lease | 6 | C | C |
| 206C | Collection at source from any other Forest Produce (not being Tendu Leaves) | 6 | C | D |
| 206C | Collection at source from Scrap | 6 | C | E |
| 206C | Collection at source from contractors or licensee or lease relating to Parking lots | 6 | C | F |
| 206C | Collection at source from contractors or licensee or lease relating to toll plaza | 6 | C | G |

| | | |
|---|---|---|
| 206C | Collection at source from contractors or licensee or lease relating to mine or quarry | 6 C H |
| 206C | Collection at source from tendu leaves | 6 C I |

3. Tax payers may please draw/issue Cheque/DDs towards payment of income-tax as under:
   Pay _________________ (Name of the bank where the Challan in being deposited)
   A/c Income-tax

PLEASE TICK THE RELEVANT BOX AT THE TOP OF THE CHALLAN. SEPARATE CHALLANS SHOULD BE USED FOR DEPOSITING TAX DEDUCTED AT SOURCE FROM COMPANY DEDUCTEES AND FROM NON-COMPANY DEDUCTEES

KINDLY ENSURE THAT THE BANK'S ACKNOWLEDGEMENT CONTAINS THE FOLLOWING:-

1. 7 DIGIT BSR CODE OF THE BANK BRANCH
2. DATE OF DEPOSIT OF CHALLAN (DD MM YY)
3. CHALLAN SERIAL NUMBER

THESE WILL HAVE TO BE QUOTED IN YOUR RETURN OF INCOME.